# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/12/2023 (शनिवार) सकाळ

## चोरी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत बायपास चौक स्पाईस व्हिला रेस्टोरेंट येथे दिनांक ०८/१२/२०२३ चे १३.०० वा. ते १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– सुधाकर नारायन खानकुरे, वय ३२ वर्ष, रा. अळंब तह कुही हे कृषी उत्पन्न बाजार समिती कुही येथे दलालीचे कामे करतात. दिनांक ०७/१२/२०२३ रोजी फिर्यादीची पत्नी सौ. शुभांगी खानकुरे हीला डिलेव्हरीसाठी धांडे हॉस्पीटल बायपास चौक उमरेड येथे भर्ती केले असुन दि. ०८/१२/२०२३ रोजी फिर्यादीचा भाऊ नामे गुणाकर खानकुरे हा फिर्यादीची गाडी मारुती सुझुकी क्र. एम एच.– ४०/सी क्यु– २९४२ घेवुन बॅकेतील पैसे काढण्याचे कागदपत्रे घेवुन धांडे हॉस्पीटल उमरेड येथे आला. त्यानंतर फिर्यादी दुपारी ०१/०० वा. दरम्यान बॅकेत जावुन चेकनी ३,३०,०००/–रु. नगदी काढुन फिर्यादीजवळ असलेल्या काळया रंगाच्या बॅग मध्ये पैसे ठेवुन फिर्यादीच्या गाडी मध्ये ड्रायव्हर सीटच्या बाजुचे सिटवर ठेवुन धांडे हॉस्पीटल येथे परत आले धांडे हॉस्पीटल समोर कार पार्कींगसाठी जागा नसल्याने फिर्यादीची कार स्पाईस व्हिला रेस्टोरेंट समोर पार्कींग करुन गाडी लॉक करुन मुलाला पहीले लसीकरण देत असल्याने फिर्यादी मुलाला घेवुन श्री साई हॉस्पीटल येथे नेण्याकरिता खाली उतरले असता फिर्यादीने आपल्या कारकडे बघितले असता कारच्या समोरील डाव्या बाजुच्या दरवाज्याचा काच फुटलेला दिसला व कार मधील काळया रंगाची बॅग ज्यामध्ये ३,३०,०००/– रु. व बॅकेचे कागदपत्रे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविंद्र वाघ पोस्टे उमरेड मो. नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

## शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा कोंढाळी फाटा येथे दिनांक ०८/१२/२०२३ चे ०८.०० वा. ते ०८.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– गजानन जानराव क्षीरसागर, वय ४० वर्ष, रा. खार तळेगाव ता. तळेगाव. जि. अमरावती हा सकाळी नागपुर डेपो मधुन मोर्शी डेपो येथे एस टी बस क्र. एम एच ४०/ वाय ५५६३ ने पॅसेंजर घेवुन काटोल रोडने निघाला असता नागपुर रोडवर कोंढाळी फाटयाजवळ सकाळी ०८/०० वा. सुमारास फिर्यादिचे बसला खाजगी बस क्र. एम एच ४० बी एफ ७७८६ चे चालकाने ओव्हरटेक करुन बसला कट मारुन तसेच आपली बस फिर्यादिचे बसचे समोर आणुन उभी करुन बस थांबवुन अनोळखी दोन पुरुष यांनी शिवीगाळ करुन हातभुक्क्याने मारपीट करुन पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपींविरुध्द कलम ३५३, ३३२, ३५१, २९४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दिनेश वरठे काटोल मो. नं. ९२८४२९५९२२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर